# प्रभु तरुण

| वर्ष ५५ | अंक ०५ | मुंबई | १६ जानेवारी, २०२२ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)*

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

www.prabhutarun.org

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## उभी इथे मी

—सुहासिनी कीर्तिकर



**आर्किटेक्ट प्रताप मोतीराम वेलकर**

खरे तर ज्ञातीतील दोन महत्त्वपूर्ण आणि आनंददायी घटनांचा डिसेंबरच्या अंकात नोंदीपुरता उल्लेख केला होता. पण मला प्रामाणिकपणे वाटते की तेवढे पुरेसे नाही. म्हणून हे या वर्षाच्या सुरुवातीचे खास संपादकीय - आपके नाम!

आपके नाम? म्हणजे कुणासाठी? हं. पहिले नाव श्री. प्रताप वेलकर यांचेच. त्यांनी शंभराव्या वर्षात पदार्पण केले. 'शुभारंभ जन्मशताब्दी वर्षाचा' या शीर्षकाखाली श्री. हर्षल मिलिंद देव यांनी त्यांच्यावर चित्रफीत तयार केली. त्यांचे चरित्रही लिहीत आहेत. 'तरुण भारत' मध्ये त्यांच्यावर खास लेख प्रसिद्ध झाला. रामवाडी मंदिराच्या विश्वस्तांतर्फे वाढदिवस सोहळा साजरा झाला. श्री. प्रताप वेलकर २६ ऑक्टोबर १९२२ (शके १८४४) रोजी या जगात आले; ही आनंददायी घटनाच जणू. आई कृष्णाबाई आणि वडील मोतीराम यांची ही पुण्याई. नारायण दिनानाथ वेलकर आणि डॉ. जयकरांच्या घराण्याला उज्ज्वल करण्यासाठीच ते अवतरले जसे. व्यवसायाने प्रतापराव आर्किटेक्ट. 'जे. जे. स्कूल ऑफ आर्किटेक्ट' मधून आर्किटेक्ट झाल्यावर त्यांनी लंडनमध्येही काही काळ अध्ययन केले. बृहन्मुंबई महानगरपालिकेचा उत्तर मुंबईचा म्हणजे गोरेगाव ते दहिसर या भागाचा नगरनियोजन आराखडा त्यांनी तयार केला आहे. 'कुलाबा मीट मार्केट' आणि असेच अन्य अनेक आराखडे त्यांनी योजिले. जीडी आर्किटेक्टचर या पदवीवरच समाधान न मानता आरआयबीए, एफआयआयए या पदव्याही त्यांनी संपादन केल्या. इतकेच नव्हे तर; १९५७ ते १९६६ आणि १९८५ ते १९९५ या काळात आर्किटेक्चर आणि नियोजनाचे वर्ग चालवून त्यांनी उत्तम आर्किटेक्ट घडवले. ही प्रतापरावांची झाली एक बाजू. पण आपण प्रतापरावांना संशोधक म्हणूनही ओळखतो. त्यांचे वडील मोतीराम बा. वेलकर हे लोकमान्य टिळकांचे अनुयायी आणि कार्यकर्ते. त्यामुळे प्रतापरावांकडे टिळकांची छायाचित्रे होती. ही चित्रे, कागदपत्रे, आठवणी या आधारे प्रतापरावांनी 'लोकमान्य टिळक आणि डॉ. वेलकर' हे पुस्तक लिहीले. अरुण टिकेकरांची या पुस्तकाला प्रस्तावना आहे. त्यात ते म्हणतात, 'न.चिं. केळकरांनी लिहिलेले लोकमान्यांचे त्रिखंडात्मक चरित्र आजही मूलभूत साधनग्रंथ मानले जाते. प्रताप वेलकर यांनी कष्टसाध्य केलेला ग्रंथ केळकरकृत चरित्रग्रंथातील एक मोठी उणीव भरून काढतो. या पुस्तकासाठी पुण्यात ग. प्र. प्रधान यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला. अरुण टिकेकर प्रमुख अतिथी होते यावेळी. यानंतर जयंतराव टिळक यांच्या सांगण्यावरून त्यांनी लोकमान्यांवर 'अव्यक्त लोकमान्य' हे आणखी एक पुसत्क लिहीले. रामवाडी राममंदिराचे ते १९५६ पासून विश्वस्त आहेत. या काळात त्यांनी दोन महत्त्वाच्या गोष्टी केल्या. 'स्वये श्रीरामप्रभू ऐकती' हे पुस्तक लिहिले आणि क्रांतीवीर चाफेकर बंधूंचे इथे वास्तव्य होते हे पुराव्यानिशी सिद्ध केले. त्याचाच परिपाक म्हणून चाफेकर बंधूंचे स्मारकही उभारले. 'पाच मुंबईकर', 'शूरा मी वंदिले', 'महाराष्ट्राच्या इतिहासाची अक्षम्य उपेक्षा', 'पाठारे प्रभूंचा इतिहास', 'महाराष्ट्राच्या इतिहासाची अक्षम्य उपेक्षा', 'पाठारे प्रभूंचा इतिहास', 'महावीर भासे हा' ही त्यांनी लिहीलेली पुस्तकेही संदर्भमूल्य असणारी आहेत. 'पाठारे प्रभुचा इतिहासा'ला य. दि. फडके यांची प्रस्तावना आहे. शिवकर बापूजी तळपदे हे विमान उड्डाणाचे जनक होते; हे त्यांनी पुराव्यानिशी सिद्ध केले. त्यामुळे विजयप्रसाद उपाध्याय यांनी शिवकर बापूजीवर चित्रपटही केला. प्रतापरावांच्या अथक धडपडीमुळे मुंबई विमानतळाजवळ 'शिवकर बापूजी चौक' तयार झाला. डॉ. नारायण सावरकरांवर 'तिसरा सावरकर' हे पुस्तकही त्यांनी लिहीले. डॉ. नारायणरावांचे 'हिंदू साम्राज्याचा इतिहास हे अपूर्ण पुस्तकही त्यांनी पूर्णत्वाला नेले. चिराबाजारात 'एम्. बी. वेलकर स्ट्रीट' उभा केला. 'Allah's sancluary Lt. Col. Dr. A.S.G. Jaykar Reseach Papers, Oman' असा प्रबंध लिहून ओमान सरकारला पाठवला. लेफ्टनंट कर्नल डॉ. कान्होबा कीर्तिकरांच्या वनौषधी विषारी वनस्पतीवरील संशोधनावरही त्यांनी प्रकाश टाकला. त्यातून 'Lt. Col. Dr. Kirtikar's poisonous plants for the raupetical Medicine 188501912 हा प्रबंध तयार झाला. ही त्यांची पुस्तके मुंबई विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठाच्या ग्रंथसंग्रहालयात उपलब्ध आहेत. असे 'अभ्यासोनि प्रकटावे' हे त्यांनी नेहमीच आचरणात आणले. डॉ. कुमुद कानिटकर यांना 'द पास्ट इन द प्रेझेंट' या विषयावर कलकात्याला पेपर सादर केला. 'चौसष्ट योगिनी व्रता'विषयी आणि पा. प्रभुंविषयीची माहिती त्यांनी प्रतापरावांकडून घेतली होती.

'डॉ. एम. बी. वेलकर स्ट्रीट' चिराबाजारात आला तो त्यांच्या प्रयत्नाने. तसेच 'भाऊ लक्ष्मण अजिंक्य चौक' झाला, खारला 'रामराव नायक मार्ग' आला. गंमत म्हणजे प्रतापरावांनी लेखनाचा, समाजकार्याचा झपाटा लावला तो वयाच्या सत्तरीनंतर. सुरेश भट एका गझलेत म्हणतात की 'जगणे निरर्थक म्हणतो तो बेइमान आहे!' भाऊसाहेब तथा प्रतापराव वयाची ९९ वर्षे ओलांडली तरी 'अर्थपूर्ण जगणे' जगताहेत. कर्तृत्व, संशोधन, अभ्यास सांभाळत त्यांनी निरोगी शतक गाठावे यासाठी 'प्रभुतरुणा'तर्फे त्यांना पुन्हा एकदा शुभेच्छा.

दुसरे नाव खास घ्यायचे ते म्हणजे बागेश्री परीख यांचे. लोकमान्य सेवा संघ, पारले या संस्थेच्या श्री. वा फाटक ग्रंथ संग्रहालयातर्फे बागेश्रींच्या 'अनुभूती - कुटंब न्यायालयीन खटल्यांची....' या पुस्तकाचे मनोविकारतज्ञ, लेखक डॉ. आनंद नाडकर्णी यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या शुभप्रसंगी प्रमुख पाहुण्या होत्या मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख. बागेश्री यांचे न्यायालयीन खटल्यांवर आधारित एक सदर प्रभु तरुणातही येत होते; याची वाचकहो, तुम्हाला आठवण असेलच.

(पान २ कॉलम १ वर)

**श्री. प्रताप मोतीराम वेलकरांवर संपादकीय लिहिलं. मग बातमी आली ती त्यांच्या दु:खद निधनाची. त्यांना प्रभुतरुणातर्फे आदरपूर्वक भावांजली. तांदूळ आणि तीळ एकाचवेळी वहाणे आले.**

**-संपादक**

संपादकीय
(पान १ कॉलम ४ वरून)
पर्यावरणतज्ञ श्री. योगेन पारीख यांची जीवनसाथी म्हणून जोड, आईवडिलांचा समृद्ध वारसा आणि आवडीचा व्यवसाय अशा त्रयींमुळे न्यायालयीन खटल्यांकडे बागेश्रींना 'अनुभूती' म्हणून पहाताना सामाजिक योगदान देता आले. या योगदानासंदर्भात या कार्यक्रमांतर्गत प्रा. स्वाती वाघ यांनी बागेश्रींची मुलाखत घेतली. ही मुलाखत विशेषच होती. बागेश्रीताई बी.ए.ला भूगोल विषयात प्रथम आल्यामुळे त्यांना मुंबई विद्यापीठाची प्रागजी मूळजी शिष्यवृत्ती प्राप्त झाली. तदनंतर 'एम.ए.' आणि 'एलएलबी' झाल्यावर मुंबई सिटी सिव्हिल कोर्टात त्यांनी विवाह समुपदेशनाची सुरुवात केली. प्रशिक्षित समाजेसवकांनी न्यायदानाच्या क्षेत्रात टाकलेले हे ऐतिहासिक ठरलेले पहिले पाऊल होते. याची नोंद घेत 'मॅरेज काऊसिलींग क्षेत्रातील पायोनियर' म्हणून वांद्रे कोर्टात त्यांचे छायाचित्र विराजमान आहे. त्यानंतर पुढचे पाऊल म्हणजे कुटुंब न्यायालयात मुख्य समुपदेशक आणि त्याची परिणिती म्हणजे १९९५ मध्ये त्या कुटुंब न्यायालयात न्यायाधीश झाल्या. आपल्या अनुभवांवर आधारित (जसे सदर लिहिले तसे) 'समस्या साहचर्याच्या' हे पुस्तकही त्यांनी लिहिले. (प्रतिभा घीवाला या पुस्तकाच्या सहलेखिका होत्या.) 'संसारगाथा' ह्या पुस्तकात त्यांचे 'रेशीमगाठी' हे सदर समाविष्ट आहे. डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या संकलित 'मनस्पर्शी' पुस्तकातही त्यांच्या दोन कथा समाविष्ट आहेत; तर 'लोकसत्ता'च्या चतुरंग पुरवणीतही काही कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. आता हे 'अनुभूती' पुस्तक. त्या लेखन ठाय लयीत करतात, कारण त्यांना जगणे समृद्ध करणारे अनेक छंद आहेत. त्या अंबूताई धुरंधरांकडे बारा वर्षे चित्रकला शिकत होत्या. चित्रे काढणे हा त्यांचा छंद आहे. रांगोळ्या रेखणे हा देखील. म्हणूनच एक वर्ष त्यांनी रंगावली प्रदर्शनही भरवले होते स्वत:च्या रांगोळ्यांचे. अर्चना गोरेंकडे त्या गाणेही शिकत आहेत. 'अनुभूती' च्या प्रकाशन समारंभात याच अर्चनाताईंनी 'माणसाने माणसाशी माणसासम वागणे' हे गाणे म्हणून समुपदेशनाशी समांतर भाव व्यक्त केला होता. लोकमान्य सेवा संघातर्फे बागेश्रीताई मुलांसाठी गणपती बनविण्याची कार्यशाळाही घेतात. निवृत्तीनंतर त्यांचे हे छंद आणि त्याशी सुसंगत कार्य बहरत राहिले. तरीही समुपदेशनाचे कार्यच त्यांचा स्वभाव आहे. म्हणूनच २०१३ पासून त्या लोकमान्य सेवा संघाच्या 'सी. म. जोशी दिलासा केंद्रा'च्या समन्वयक आहेत. हे दिलासा केंद्र ज्येष्ठ नागरिकांसाठी दिलासा देणारे आहे. असा कामातील दिलासा बागेश्रीताई विविध छंदांतून जोपासतात म्हणूनच आज त्या 'बापनू घर' या संस्थेच्या कमिटीवरही आहेत. 'अनुभूती'चे प्रकाशन उपस्थितांना आनंदाची अनुभूती देणारे होते ते यामुळेच. या प्रसंगी उपस्थित असलेल्या न्यायमूर्ती सुजाता मनोहर, न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांचा फळांची करंडी देऊन सत्कार करण्यात आला; तसेच श्री. वा. ग्रंथसंग्रहालयातर्फे बागेश्री-ताईंचाही 'सुफल' सत्कार झाला.

'अनुभूती' पुस्तक अटकर बीध्याचे म्हणजे पंधरा अनुभूतींचे आहे. त्यात बागेश्रीताईंनी कुठलीच घटना अतिरंजित केलेली नाही. अनुभवाचे 'निकोसत्व' या कथनात आहे. 'सत्कर्मयोगे वय घालवावे' या वृत्तीने त्यांनी हे कार्य केले, ते वाचकांसमोर मांडले आहे. स्वत:च्या प्रतिक्रिया, अदमास प्रामाणिकपणे मांडले आहेत. पालकत्वाचे द्वंद्व, पोटगीची मागणी, परस्परसंबंधांचे काही वेळा राजकारण, प्रौढविवाहानंतरच्या समस्या, पालक घटस्फोटानंतरची मुलांची घुसमट, काही वेळा अटळ ठरणारा घटस्फोट, स्त्री म्हणून करावा लागणारा परिस्थितीचा सामना... असे बरेच काही अगदी खरेखुरे इथे या पुस्तकात निखळपणे, साधेपणाने मांडले आहे. हे मांडताना माणसांना समजून घेऊन समुपदेशन करण्याची त्यांची भूमिका पारदर्शी आहे. लेखांना साजेशी चित्रे या पुस्तकात आहेत. त्या चित्रकार दातेंचाही सत्कार या समारंभात झाला. एकूणातच संपूर्ण समारंभ साजरा झाला; तसेच पुस्तकही नकळत संस्कार करणारे साजरे असेच आहे.

या प्रतापराव आणि बागेश्रीताईंच्या समृद्ध जगण्याने आपली ज्ञात अधिक सुसंस्कृत, समृद्ध होते आहे; ही शुभंकर बाब आहे. म्हणूनच नववर्षाच्या सुरुवातीला या दोघांच्या कर्तृत्वाला सलाम केला. म्हणता म्हणता नववर्ष सुरू झालेच की हो! त्याचे मनापासून स्वागत करताना शांताबाई शेळकेंच्या ओळींचा आधार घ्यावासा वाटतो. त्या म्हणतात, 'उभी इथे मी पसरून बाहू

नवीन वर्षा, तुझ्या स्वागता' तीच माझीही भावना. नवीन वर्षा, तुझे मनापासून स्वागत!

*

New Column

# ``WORDPLAY"

-Armaan Kothare

*"Going Dutch" refers to each person involved in a transaction contributing to the total sum by dividing the amount among the people equally, rather than one person paying for it entirely.*

***

*"Going Dutch" refers to each person involved in a transaction contributing to the total sum by dividing the amount among the people equally, rather than one person paying for it entirely.*

Today was going to be an awesome day for two reasons; firstly, my company was going to give us a vacation starting from tomorrow, and secondly, for the first time in 5 years, I was going to meet my cousins for dinner!

Ever since I moved to this state, my days have just been full of meetings, breathing, and more meetings. Especially this year, we worked on a new project and it was literally hell. Even our vacations were short lived, unlike the one that would start tomorrow, which would last for a whole fortnight.

(cont. on page 4 col. 4)

## भावांजली

प्रताप वेलकर यांच्या निधनाची बातमी वाचून दु:ख झालं. याला कारणही तसंच होतं. बातमीत असं म्हटलं होतं की त्यांनी वयाच्या शंभरीत प्रवेश केला होता. इतकं दीर्घ आयुष्य लाभणाऱ्या व्यक्ती फारच थोड्या असतात पण मिळालेलं दीर्घायुष्य सत्कारणी लावणाऱ्या व्यक्ती तर त्याहूनही दुर्मीळ असतात. प्रतापराव हे अशा दुर्मीळ व्यक्तींपैकी एक होते. म्हणूनच त्यांच्या जाण्याने हळहळ वाटली.

माझा आणि त्यांचा संबंध एका पुस्तकाच्या निमित्ताने आला. 'लोकमान्य टिळक आणि डॉक्टर वेलकर ' हे ते पुस्तक. मला वाटतं ते त्यांचं पहिलंच पुस्तक असावं. अनेक वर्षं सखोल संशोधन आणि अभ्यास करून त्यांनी ते लिहून काढलं होतं. त्यांचे वडील डॉ. मोतीराम बाळकृष्ण वेलकर हे लोकमान्य टिळकांचे सहकारी होते आणि ते टिळकांबरोबर इंग्लंडला गेले होते. त्यावेळच्या त्यांच्या डायऱ्या, त्यांनी लिहिलेली पत्रं, त्या वेळच्या वृत्तपत्रांतली कात्रणं, फोटो असा प्रचंड दस्तऐवज प्रतापरावांनी सांभाळून ठेवला होता. त्या सर्व साधनांचा अभ्यास व उपयोग करून त्यांनी हे पुस्तक लिहिलं होतं. प्रतापराव स्वत: पेशाने आर्किटेक्ट होते त्यामुळे अशा प्रकारचं इतिहास संशोधनात्मक लिखाण करण्याचा त्यांना पूर्वानुभव नव्हता, म्हणून त्यांचे मित्र-मार्गदर्शक डॉ. अरुण टिकेकर यांनी त्यांना पुस्तकाचं संपादन करून घ्यावं असा सल्ला दिला आणि त्यासाठी माझं नाव सुचवलं.

मी अतिशय आनंदाने हे काम स्वीकारलं आणि खूप मेहनत घेऊन ते पूर्ण केलं. हे पुस्तक प्रकाशित झाल्यावर त्याचा बराच बोलबाला झाला आणि लोकमान्य टिळकांच्या कालखंडाचा एक महत्त्वाचा दस्तावेज म्हणून त्याचं स्वागत झालं.

प्रतापरावांबरोबर काम करताना त्यांच्या स्वभावाचे काही विशेष मला प्रकर्षाने जाणवत गेले. एक म्हणजे ते ऐतिहासिक माहितीचं एक चालतंबोलतं भांडार होते. पाठारे प्रभू ज्ञातीचा इतिहास तर त्यांच्या मर्मबंधातली ठेव होती; अर्थात हे नंतर त्यांनी लिहिलेल्या 'पाठारे प्रभूंचा इतिहास' या पुस्तकानेच सिद्ध केलं. दुसरं म्हणजे त्यांना स्वत:जवळ असलेली माहिती दुसऱ्यांना देण्याची कळकळ होती, उत्कट इच्छा होती आणि ती ते कुणालाही निरपेक्षपणे देत असत. तिसरं म्हणजे आपल्या ज्ञातीतले श्री. शिवकर बापूजी तळपदे या 'मरुत्सखा' या पहिल्यावहिल्या विमानाची निर्मिती करणाऱ्या व्यक्तीविषयी त्यांना नितांत आदर होता आणि त्यांचं मुंबई नगरीत योग्य स्मारक व्हावं यासाठी त्यांनी प्रचंड प्रयत्न केले हे मी पाहिलेलं आहे. सरतेशेवटी ते राहत होते त्या जागेपासून थोड्या अंतरावर, सहार विमानतळाच्या रस्त्यावर त्यांनी 'शिवकर बापूजी तळपदे चौक' या नावाचं एक देखणं स्मारक उभारलं तेव्हा त्यांना कर्तव्यपूर्तीचा जो आनंद झाला तोही मी पाहिलेला आहे.

प्रतापरावांसारखी एखाद्या विषयाचा ध्यास घेऊन, आपलं स्वत:चं रक्त आटवून समाजाची सेवा करणारी माणसं पुन्हा कधी दिसणार नाहीत. त्यांचं आयुष्य सफल झालं याचंच आता समाधान मानलं पाहिजे. परमेश्वर त्यांच्या आत्म्याला सद्‌गती देवो हीच प्रार्थना. ॐ शांति: शांति: शांति:।

**-मृदुला जोशी**

(मृदुला जोशींची प्रतिक्रिया लोकसत्तात प्रसिद्ध झाली तरीही 'पाहिलेचि पहावे पुन्हापुन्हा' या न्यायाने औचित्य राखून ती इथे घेतली आहे.

-संपादक)

नवे सदर

# थोडं बोलू या

-श्रेया तळपदे

थोडं तुझं-थोडं माझं

नमस्कार मंडळी. खूप दिवस झाले, अहो दिवस काय दोन वर्षच म्हणाना, समोरा-समोर भेटून गप्पा नाही मारल्या की एखाद्या मुद्यावर चर्चा नाही केली किंवा 'हिचा मुलगा काय करतो? त्याची मुलगी काय शिकते?' अनुरूप विवाह मंडळाला शोभतील अशा माहित्याही एकमेकांना दिल्या नाहीत. आपल्या ज्ञातीच्या कित्येक कार्यक्रमात आपली भेट व्हायची. मग तो 'महिला समाजाचा' कार्यक्रम असो, सोशल समाजाचा कार्यक्रम असो, प्रभु-प्रभुतच १ मे चं नाटक असो, हौशी कला मंदिरचे दिवाळीचे स्नेह सम्मेलन असो वा 'प्रभु तरुणाचा' वर्धापनदिन असो. पण गेले २ वर्ष आपण सगळेच ज्ञातीतील बंधु-भगिनींच्या गाठीभेटींना मुकलोय. तरीही आपल्या ज्ञातीतील संस्थांनी या परिस्थितीवर मात करून नवीन संपर्क माध्यमांच्या मदतीने अगदी उत्कृष्ट ऑनलाइन कार्यक्रम आपल्याला दिले. त्या कार्यक्रमांचा आनंदही आपण उपभोगला. त्याच धर्तीवर म्हटलं आपणही 'प्रभु-तरुणा'च्या माध्यमातून गप्पा मारुया,

थोडं बोलू या...

मंडळी आयुष्यात आपण वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळ्या व्यक्तींना भेटतो, अनेक गोष्टी शिकतो, वेगवेगळे अनुभव घेतो. असंच अभिनयक्षेत्राच्या प्रवासात मलाही वेगवेगळे अनुभव आले, येत आहेत. वेगवेगळ्या व्यक्ती भेटतात. असाच प्रवास सुरू असताना काही अंतर पुढे गेल्यावर मला दोघंजण भेटले. प्रथम पाहता त्यातला एक पुरुष आणि दुसरी स्त्री वाटली. जसजशी मी त्यांच्या जवळ जात होते; त्यांच्यातलं भांडण कानी पडू लागलं. दुसऱ्यांचं भांडण म्हटलं की इतरांना जरा जास्तच त्यात रस असतो की, पुढे काय होतेय? कसं भांडतायत, कशावरून भांडतायत वगैरे-वगैरे... मानवी स्वभाव! काय करणार, तुम्हाला खोटं वाटतंय? अहो मला सांगा खोटं असतं तर 'बिग बॉस'सारखा 'शो' नंबर १ टी.आर.पी. वर असता का? आता तुम्ही म्हणाल हे टी. आर. पी. म्हणजे काय बाबा? यावर सविस्तरपणे पुन्हा बोलू कधीतरी, तूर्तास एवढंच सांगेन की जास्त प्रेक्षक ज्या 'शो' ला लाभलेत तो कार्यक्रम. मानवी स्वभाव; काय करणार? असं नसतं तर सासू-सूनेच्या भांडणावर चाललेल्या मालिका चालल्या असत्या का? ह्याच सूत्राप्रमाणे मला भेटलेल्या त्या दोघांमध्ये नक्की कशावरून भांडण चाललंय हे जाणून घेण्यासाठी मी अजूनच त्यांच्या जवळ गेले तेव्हा मला कळलं, ज्याला मी पुरुष समजत होते त्याचं नाव 'नाटक' आणि स्त्री वाटली ती 'सिरियल'. मी त्या दोघांपाशी जाऊन विचारलं, ''काय झालं? का भांडताय?'' त्यावर सिरियल म्हणते कशी...

'तू नाटक, मी सिरियल
तू हट्टी मी अडीयल
तुझा लाखोंमध्ये खर्चा
माझी करोडोत चर्चा
वर्षानुवर्षे तुझा एकच बॅनर
माझ्यासाठी तर बदलतात चॅनल..'

तिचा हा आवेग बघून मी तिला म्हटलं, ''अगं, थांब असं स्वत:चंच कौतुक करू नकोस. नाटकाचाही मुद्दा ऐकून घे.'' माझं बोलणं संपतं न संपतं तोच नाटक पटकन म्हणाले,

''थोडं मला ही बोलू दे, नाट्यगृहाचे दरवाजे आता प्रेक्षकांसाठी उघडू दे..''

त्याच्या तोंडून हे ऐकताच सिरियल बोलते कशी;

''उघडले नाट्यगृहाचे दरवाजे जरी.
तरी आहे बुकींगचा अभाव.''

नाटक ते यावर गप्प कसं बसेल? लगेच उत्तरले,

''जरी असला बुकींगचा अभाव, तरी तुझ्यावरही आहे की टी.आर.पी.चा दबाव. हा..हा..हा... या दबावाखाली कित्येक लेखक चिरडले गेले. नाटकांनी मात्र कैक लेखकांना अजरामर केले.'' या नाटकाच्या वक्तव्यानंतर दोघांची जणू जुगलबंदीच सुरू झाली. मी आपली गोंधळलेल्या अवस्थेत दोघांचे मुद्दे ऐकण्याचा प्रयत्न करत होते.

सिरियल म्हणते, ''तरीही मला आवर्जून बघतात लोक.''

नाटक- ''हो कारण त्यासाठी त्यांना खाजवावं लागत नाही डोकं..''

''अगं, तुझ्याकडे असेल लोकांची गर्दी
पण माझ्याकडे प्रेक्षक आहे दर्दी..''

सिरियल- ''इतकीही मी वाईट नाही. माझ्याकडे ग्लॅमर आहे नाईट नाही..''

नाटक म्हणते, ''स्वत:चंच खरं करण्याचा तुझा आहे स्वभाव.''

सिरियल- ''गरीब बिचारा असण्याचा तूही नको आणूस आव..''


(पान ४ कॉलम ३ वर)

नवे सदर

# मुंबई बदलते आहे...

-उज्ज्वला गोविंदराव भगवंतराव आगासकर
बी. आर्क. (मुंबई), फोटोजरनॅलिस्ट

आपण जेव्हा स्वत:शी विचार करतो तेव्हा आपलं घर, आपली गल्ली, आपली कॉलनी, आपलं शहर, आपलं राज्य, आपला देश एवढीच आपली जगाची कल्पना मर्यादित असते. फार तर पृथ्वीच्या पाठीवरचे इतके अनेक देश. पण पृथ्वीच्या पलिकडे इतर ग्रह, त्यांचा निर्माता सूर्य, असे अनेक ग्रह असलेल्या अनेक आकाशगंगा असे अफाट जग पसरले आहे. या सर्व विश्वाचा कारभार कसा चालत असेल याचा विचार केला तर एक महत्त्वाचे सूत्र लक्षात येते ते म्हणजे काळ, समय. हा अव्याहत चालत असतो आणि कुठे, कधी, कसे, काय घडणार हेही तोच ठरवतो. आपल्याकडे फक्त प्रेक्षकाची भूमिका राहाते. 'गेलेला क्षण, सुटलेला बाण आणि बोललेला शब्द परत येत नसतो' हे लक्षात ठेवूनच आपल्याला वागावे लागते. पण कालानुरूप जे बदल होत राहतात त्यांची नोंददेखील घ्यावीच लागते, तरच आपल्याला आयुष्याशी जुळवून घेता येते. हे सर्व लिहिण्याचे कारण म्हणजे आपल्या सर्वांची मायबाप मुंबई, जी आकराने अगदी लहान असूनही हिन्दुस्थानाच्या कारभारात महत्त्वाचे स्थान पटकावून बसली आहे, तिचे आजचे झगमगीत स्वरूप आपण अनुभवतो आहोत; पण ती पूर्वीपासून तशीच होती काय? आढावा घ्यावा म्हटले तर काय हाती लागेल? असा विचार आला. तिच्या रूपात गेली काही शतके कसा बदल होत गेला याचा मागोवा घेतला तर बरीच मनोरंजक माहिती हाती लागते. पूर्वी हळूहळू होत राहणाऱ्या बदलांचे गाडे, इ.स. १६६५ मध्ये मुंबईवर ब्रिटिशांचा ताबा आला तेव्हापासून गियर बदलून झपाट्याने धावू लागले. त्यामुळे मुंबईच्या मूळच्या सात बेटांचा ब्रिटिशांनी मोजमापे करून तयार केलेला इ.स.१६७० मधला नकाशा हा आधारासाठी घेतला आहे व तेव्हापासून झालेल्या बदलांच्या सुरस आणि चमत्कारिक कथा यथाकाल सांगाव्या म्हणते या सदरात. दक्षिणोत्तर पसरलेल्या या सात बेटांची नावे क्रमाने, कुलाबा, धाकटा कुलाबा, मुंबई, माझगांव, परळ, वरळी आणि माहीम अशी आहेत. पठ्ठे बापूरावांनी म्हटल्याप्रमाणे 'मुंबई नगरी बडी बांका, तिचा तिन्ही लोकी डंका!' त्या डंक्याचा आवाज ऐकू या आपण सारे!



# FILMS THAT HAVE INFLUENCED OUR THINKING

**-Anarkali Sandip Velkar**

This is my concluding column of Prabhu Tarun which covers views on a very thought provoking popular topic "Films", to understand how Films or movies have played an influencing role in our thinking.

Movies are a very powerful medium and mean different things to different people. For some it is pure entertainment which takes them into the world of fantasy. Some expect to read something meaningful into the movies. But you can definitely say that most people are deeply influenced by films, maybe at a subconscious level.

**Age Group 25+**
**Pranav Sandeep Velkar, Engineer & MBA**

As school going kids, we wanted to perform our best. However trivial, we are driven by titles. As we grow, the requirement to label ourselves with our designations at work takes a toll on us. Sometimes, achieving that, becomes the only aim. In the pursuit to achieve titles, do we forget to excel?

Starring Aamir Khan, "3 Idiots" talks about chasing excellence instead of success. The movie runs us through a brilliant story of 3 friends studying at a pioneer engineering college and are completely different from one another. Using funny anecdotes and incidents throughout the movie, they conclude that it is the excellence of the scientist Phunsuk Wangdu played by Aamir Khan which is chased by the title driven employee of an MNC played by Omi Joshi.

This movie inspired me during my college days. While studying, I took an effort to understand the subject rather than just studying for the exam. It made me believe that if I excel in the subject, then the exam will be a walk in the park.

Similarly, if we truly excel in all endeavours in life and be patient, then titles will chase us eventually.

**Age Group 60+**
**Achala Subhash Desai, Arts Graduate and Banker**

Indian cinema has gone a long way in all aspects of evolution. I wonder if cinema has affected society or the society in general has influenced the changing patterns of cinema!!

Different strata of society and different age groups have their own choices.

I happened to watch a Hindi movie "Once Again". The title suggests a second innings in one's life. The movie is a Shefali Shah and Neeraj Kabi starrer who play two middle-aged people exploring love and trying to find companionship. After losing life partners for some reason, there is a longing to share the beauty and turmoils of life. I learnt there is no age to fall in love. The 50+ people do have the right to live life to the fullest.

***

Wishing all the Prabhu Tarun readers a very happy and most importantly healthy New Year 2022. These 12 months have been an enriching experience for me. Thanks to Smt. Suhasini Kirtikar and the Prabhu Tarun Team, I could write about some of the people who have greatly influenced my life. I also got an opportunity to interact with people from various age groups and professional backgrounds to understand their thought processes on various topics.

I hope you have all enjoyed reading my column as much as I have enjoyed, writing it for you. AU REVOIR till we meet again……..

(सदर समाप्त)

*

## अभिनंदन

* डॉ. सुमन नवलकरांची 'आंधळी कोशिंबीर' (कविता संग्रह) आणि 'माणूस आडवा जातो तेव्हा' (विनोदी कथासंग्रह) अशी दोन पुस्तके प्रकाशित झाली. 'व्यास क्रिएशन' तर्फे पुस्तक आदान प्रदान महोत्सव झाला. त्याप्रसंगी प्रतिभा सराफ यांच्या पुस्तकाचे प्रकाशन प्रमुख अतिथी या नात्याने डॉ. सुमन नवलकर यांच्या हस्ते झाले.

* दिल्ली येथे झालेल्या 'राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद' ६४ व्या स्पर्धेत कु. वैजयंती विश्वास अजिंक्य' दहा मीटर एअर पिस्तुल शूटींग' या गटात सहभागी झाली. तिला ६०० पैकी ५४३ गुण मिळाले. (गुणवत्तेसाठी किमान ५३३ गुण आवश्यक असतात.) त्यामुळे पुढील दोन वर्षे राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तिला पात्रता फेरी आवश्यक नाही. थेट प्रवेश मिळेल. पिस्तूल शूटींगचे तिचे हे तेरावे वर्ष आणि राष्ट्रीय पातळीवरील हा दहावा सामना.

* सौ. अचला सुभाष देसाई यांनी संस्कृती मराठी मंडळ, ठाणे येथे कोलंबीचे खडखडले आणि चटणीच्या सरंग्यांचे प्रात्यक्षिक दाखवले. वृंदा देशमुख यांनी त्यांची मुलाखत घेतली.

* श्री. विनय त्रिलोकेकर यांचे

(पान ३ कॉलम २ वरून)

नाटक- ''आहेच मी गरीब बिचारा

सिरियल- ''असं वाटतं तुला, तुझ्या नाटकी तऱ्हा समजतात मला..

एका क्षणी 'तू म्हणशील तसं' असं गोड-गोड बोलतोस, दुसऱ्याच क्षणी 'तो मी नव्हेच' म्हणून विषय संपवून टाकतोस.''

नाटक- ''लोकांचा 'तुझ्यात जीव रंगला' म्हणून इतकी हसू नकोस आणि 'देवमाणूस' दाखवून लोकांना फसवू नकोस.''

सिरियल - ''तू ही काही कमी नाहीस बरं का... 'हाऊस फुल' ची पाटी लागताच लगेच जातोस हवेत. 'सही रे सही' म्हणता म्हणता प्रेक्षकांना घेतोस कवेत.''

बापरे! ही जुगलबंदी काही संपायचं नावच घेईना. शेवटी मी म्हटलं, आपल्यालाच आता यात पडायला हवं. या दोघांनाही समज द्यायलाच हवी. मग मीही त्यांच्याच भाषेत सुरुवात केली.

''तुमच्यातला वाद आता होत चाललाय डेली सोप

थांबवा हे भांडण नाहीतर रंगदेवतेचा होईल कोप.''

शेवटी सिरियल असो वा नाटक, मनोरंजनाचे दोघेही आहात द्योतक... अरे नाटका; तू रंगमंचावर आणि सिरियल; तू टेलिव्हिजनच्या पडद्यावर करत रहा मिरॅकल कारण... तू नाटक, ती सिरियल... अशा शब्दात समज दिल्यावर नशीब समजले दोघांनाही. तसे दोघेही समजूतदार आहेत. पण कधी-कधी होते नवरा-बायकोसारखी 'तू-तू मैं-मैं' या मनोरंजन सृष्टीचा संसार चालवायला दोघांनाही एकमेकांच्या सहकार्याने, एकमेकांना मान देऊन चालावं लागतं कोणी-कोणाशी तुलना करू नये. आपापल्या जागी दोघेही श्रेष्ठच आहेत. थोडं तुझं- थोडं माझं ही भूमिका साकारावीच लागते. तर इतक्या गोष्टी शिकवून जाणारा हा अनुभव... नाटक आणि सिरियल यांची भेट माझ्यासाठी फारच मनोरंजनात्मक होती. तुम्हालाही ही भेट आवडेल अशी आशा करते. असे अनेक अनुभव तुमच्याकडे मांडायचे आहेत.

तेव्हा पुढच्या महिन्यात पुन्हा, थोडं बोलू या.

*

'अद्भूत गोष्टींचा संग्रह आणि एक चित्तथरारक पाठलाग' हे पुस्तक आता https://www.amazon.in/dp वर उपलब्ध करण्यात आले आहे. या गोष्टी प्रभुतरुणात सदर म्हणून येत होत्या आणि या पुस्तकाची प्रस्तावना श्री. महेश कोठारे यांची आहे.

(Cont. from page 2 col. 4)

So I left my place in a very happy and cheerful mood, very hopeful and excited.

***

After work was over, I quickly went home to freshen up. 5 whole years! Even though we're all grown up now, I just couldn't stop thinking about how much they'd have changed; both physically and mentally, as people.

In all these years, we only talked to wish each other on birthdays, but that was all. Sometimes I regret having shifted here because somewhere at the back of my head, I felt like I had lost that bond with them.

I finally reached the restaurant across my building, and sent them the location. They said they'd reach in 10 minutes, and so I waited for them.

As I ordered some garlic bread, they walked right into the restaurant. It wasn't very cinematic, but happened anyway. Josh, the elder one, hadn't changed as much physically, but Chris had gone full on hair-dye; his hair was now light brown, and it surprisingly suited him well.

I greeted them and talked about the most significant events of the past 5 years- which were basically all of us getting jobs. Chris was working for a marketing firm, and Josh was the owner of a publishing house. And me? I was a software engineer, just like everybody else.

After 10 minutes of making sure we hadn't missed out so much, we called the waiter for our order. Josh and Chris ordered separate pizzas for each other, but didn't seem like they'd be able to finish them by themselves. So I told them I'd share their order.

Eventually, everyone ended up eating some slices from both pizzas.

And that's when I noticed the absolute animals that they were.

Josh ate 3 entire medium crust pizza slices from his own order, and 2 other ones from his brother's. And his brother too ate 4 from his own and 3 from Josh's.

I don't know about other people, but that's definitely a huge no-no for me.

After our chats, food and drinks were done, we asked the waiter for the bill. As the nearest one started walking towards our table, Josh told us about his little secret: he had gotten a singular note, as he "knew" he wouldn't go above the budget.

Chris looked mildly annoyed upon hearing this, but didn't say

(Cont. on 6 col.3)

New Column

# TRAVELOGUE

-Aadhar Kothare

**Tranquillity in the woods - The Machan**

The Machan is an exclusive eco-resort with unique tree houses rising 30-45 feet above the forest, offering complete serenity to those looking to escape into nature. All of its individual accommodations are floating in the air, with enchanting views and elegant rustic interiors. Each machan has been carefully designed to minimize any impact on its natural surroundings while offering its inhabitants spectacular views in luxurious comfort. Located in Jambulne, one of 25 biological hotspots of the world and a mere 2.5 hrs. drive from Mumbai (1.5 hrs. from Pune), the Machan makes for an accessible weekend getaway.

It is surrounded by forest in a remote rural area, Korigad (10kms away), a hilltop fort and Bhushi Dam (11 kms away). One has to cross Bhushi dam, then move up on the ghats and cross Tiger point and move towards Aamby Valley, but some 9-10kms before, one reaches a 'V junction' near Cloud 9 resorts. One need to take a left on the 'V junction (one can see the monkey signboard, which is on the Machan signboard – name of the resort is not mentioned). Once you take a left, and move ahead, one needs to take another small left at yet another 'V junction' and move ahead on Javan Tungi road. The road from here is really bad or should I say there is no proper road at all, so be ready for a bumpy ride (refrain from taking low sedans or hatchbacks is a small advice though people do get those as well). Approx. 1.5kms later, one can see a left lane that goes inside a dense forest on a pebbles clad road, 200mtrs inside, you will be standing in front of huge iron gate of the Machan. The man on the gate will check your booking details and after receiving confirmation from the main desk, will let you in. In the middle of the dense forest they have made a small curvy concrete path to drive in and drive out of the resort. Once you reach the reception, you will be greeted by their warm staff who will help you with your check-in process. They will assign a person who will guide you and your car to the parking near your designated Machan and help you with your luggage as well.

Rustic, multi-level treehouses are individually decorated, all feature living rooms, loft bedrooms and en-suite bathrooms. All Machans are air-conditioned. Distinct touches in some machan's include glass walls with forest views, plus outdoor baths and balconies. Some machan's are accessible via walkways or wood and rope bridges. Room service is available for all machans.

❊ **Woods (ground based) and The Cabin (ground based)** – Cabin in the woods is the right choice for a cozy and romantic getaway for couples. Nestled under the Jungle Machans, the Woods are great for those who want to be within Nature and get a feel for living within the trees. With a King-sized bed, teak-floored fully equipped modern bathrooms, and an outdoor balcony, the Woods are the right weekend escape away from the hustle and bustle of city life.

❊ **Canopy Machan –** Perched on the edge of a valley, the independent Canopy Machan comprise of a large northeast facing deck, master bedroom and an attached modern bathroom (including a standalone bathtub). A spiral staircase leads up to its door. From within the room itself, one gets a 220-degree unobstructed views of the pristine Sahyadri hills. It is recommended for couples and those with young children. Due to their location, they are considered by many, as one of our most romantic Machans.

❊ **Forest Machan –** They rise majestically up in the air, offering our guests views of the dense forests of the Western Ghats. An Indiana Jones-esque wooden bridge effortlessly guides you to your floating abode. The Forest Machan's suite-like accommodations with a Queen bed and master bathroom have been meticulously designed to create comfort amidst timberland surroundings. These Machans are well suited for families with children.

In the Monsoons, the constant rush of the nearby stream brings Nature right to your doorstep.

❊ **Jungle Machan –** Nestled within the trees, the arboreal Jungle Machan accommodations are the perfect match for couples looking to completely escape into Nature. These machans are perfectly matched for hardcore Nature lovers, with living trees sprouting from the floor and going through the roof, and the feeling of being one with Nature is fully encapsulated. The Jungle Machans boast of large King sized beds, modern bathrooms as well as outdoor standalone bathtubs making them truly comforted by Nature combined.

❊ **Sunset Machan –** Each independently floating Sunset Machan has a bedroom, loft, and a private wooden deck with bath-tub. It comes with a king-sized four-poster bed, antique brass fittings, and recycled old ship lamps. It includes a private bathroom and an open to sky shower. For larger families and groups (max up to 4), a short staircase leads up to the Loft which offers the benefit of an additional King size bed and its own attached bathroom.

❊ **Heritage Machan –** Heritage Machan is a 2,400 sq. ft. tree-house villa floating within the forest canopy and built around a large Fig tree. It offers 300-degree views of our forest and evergreen hills through its large glass walls. It comprises of three separate sleeping areas, a seating, as well as, a dining section. It has two fully equipped bathrooms. With its own dining space, all the meals are conveniently served within the Machan itself. A spiral staircase takes you up another 40 ft above this structure to a small, open to the sky platform, known as the Crow's Nest. It is easily approached by a gentle ramp and is close to the parking lot. Its old-world charm is ideal for close-knit families/group of friends and senior citizens. Ideal group size is 4-6 adults.

❊ **Starlight Machan –** Set amidst thick forest cover and verdant foliage all around, the Starlight Machan is the very definition of a heavenly abode. Bringing the ancient concept of a "star bed" to the modern era, our luxurious Starlight Machans have a translucent, retractable roof for guests to enjoy the pitter-patter of the rains in the Monsoons and the starry night sky in the Winters & Summers. Each Starlight Machan is eclectically designed with its four-poster bed, antique writing table, stone-topped bar et al. With stylish Iberian tiles even the bathrooms entice you to enjoy an outdoor rain shower or a romantic sunset soak in the bathtub on your private deck. Just when you thought that a Machan in the middle of a forest with a panoramic view of the hills and a retractable roof to indulge in stargazing was more than enough, the pièce de résistance of this stylish Machan is the swanky plunge pool located right below it. Designed to marry nature, luxury, and romance together, the Starlight Machan is quite simply, magic. The Starlight Machan is one of the primary reasons why The Machan is one of the most luxurious weekend getaways near Mumbai and Pune. Each Starlight Machan has five sections:

a) Main Deck with a Translucent Retractable Roof
b) The Hanging Room
c) Two Full Baths, an Outdoor Shower and a Bathtub on the Deck
d) Plunge Pool and two private decks

Starlight Machans are recommended for couples & families with older children (ages 12+). If you are looking to go as a group or a family, the cozy hanging room below the main deck makes for the perfect guest bedroom allowing this Machan to comfortably accommodate up to four adults.

While booking one can book with or without breakfast. Lunch, evening meals/dinner are also available on buffet/a la-carte basis for separate charges. The spread for each of the meals is very humble and well balanced between their veg and non veg options. If you ever see jalebis at their live counter, make sure you have enough place in your tummy for those crunchy piping hot sweets (you can thank me later for it).The unique thing about each of the meals is that one needs to sit and eat in the designated areas built inside the forest on the porch or near the camp-fire area providing a perfect 'food in the wood' feel. There are no lights in the path from main reception area to the machans, hence you can use the torch provided in the machan. They usually offer 2 slots for every meal, so book your slot accordingly. Amenities available are a spa, and a sprawling forest for birding. There is also a 4 km of private paths, on which guided trails are conducted to expose the guests to the beautiful flora and fauna of the region. The place is well managed with a small but a very efficient & friendly staff at your service under the supervision of Sakshi.

Though they allow one to book the machan's for 1 night, a small suggestion that min. of 2 nights is a perfect time to spend in the woods. One doesn't get mobile network in at-least 5kms vicinity in and around the Machan (though sometimes one do get some network in the reception area), so in case you are a social media bug, and can't live without it, this is not a place for you. For emergency purpose reception area and each of the machan is equipped with a landline phone. There is a limited but a good mixed variety of food options from Pizza to Onion Bhajiyas to Chinese starters on the room service menu. Hard drinks are not available at the resort and there are no nearby places to fetch one. Though the overall pricing of the stay and food is a bit on a higher side, I would still suggest that one must visit the place at least once as the memories built inside the resort are priceless.

❊

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ रामवाडी येथील राम मंदिराच्या विठोबा कान्होजी कोठारे चॅरिटीज ट्रस्टतर्फे श्री. प्रताप मोतीराम वेलकरांच्या शतकोत्सवी वर्षातील पदार्पणाबद्दल रु. १०००/-

⁕

## पाठारे प्रभु चॅरिटीज

पाठारे प्रभु चॅरिटीजची वार्षिक ऑनलाईन सभा बारा डिसेंबर रोजी घेण्यात आली. दरवर्षी जूनच्या पहिल्या रविवारी ही सभा होते. पहिल्यांदाच परिस्थितीमुळे हा क्रम डावलला गेला. चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. उदय मानकर यांनी ही बाब नोंदविली. आधीच्या सभेचा अहवाल विश्वस्त सौ. मेधा वाझकर यांनी सभेपुढे ठेवला. श्री. संदीप वेलकर यांनी अनुमोदन दिले. श्री. राजन जयकरांनी हिशोबाबद्दल माहिती दिली. श्री. रामदास धुरंधर यांनी अनुमोदन दिले. ‘प्रभुतरुण’ संपादिका प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांनी चॅरिटीजच्या कार्याचा गौरवपर उल्लेख केला. अध्यक्षांनी विनंती केल्यानंतर विश्वस्त अजित विजयकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रभुतरुणाचा सकारात्मक प्रतिसाद आणि संपादकांची उपस्थिती याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. अध्यक्षांनी अहवाल सद्य परिस्थितीमुळे जवळजवळ एका हाती केल्याचे सांगून त्यांनी ही ऑनलाईन सभा सर्वात तरुण विश्वस्त श्री. अमित कोठारे यांचेही आभार मानले. तदनंतर सभा समाप्त झाली.

⁕

(Cont. from Page 4 col. 4)

much. He just nodded and looked at the bill. Chris looked mildly annoyed upon hearing this, but didn't say much. He just nodded and picked up the bill to take a glance. The total was 1500, and so I thought we could split it among ourselves.

"Oh ho! Look who sits peacefully watching us quarrel! You sly cheapskate!" Josh snarled, and held his demanding glare, almost threatening me.

"Look Josh, I think we should split the bill three ways equally and just get it over with." I said, nervous as hell on the inside.

"Not happening! I knew it! You had that extra slice! You know what? I'm not even going to pay a penny extra!" He once again, fumbled with his calculator, slammed his note onto the table and walked out the door without looking back.

"What's wrong with him?" I asked Chris, still shaken.

"Oh no, don't you try to gain any approval from me, you know what you did."

And saying so, he too calculated his share and left the restaurant.

I couldn't believe any of that actually happened, it was all so sudden, and a LOT to take in. I looked at their calculations and stopped to think for a second.

Not only was their way of calculating wrong, but they had also hustled me! Josh payed less than he should've, Chris too did the same, and in the end, the one with the highest contribution was ME.

And if that wasn't enough, Josh didn't even pay for his water!

"Well, well, well...." I muttered, and pulled out the remainder of the amount, and walked back to the exit. But before I could head out, I heard the waiter call my name in anger. "Hey you! Mr Davies! This isn't real money!! These are printed paper sheets!"

I tried to process what he said, but before I could, my gaze shifted towards the television set in front of me.

[*Headlines: "The Davies-Dinner-Thieves are back on tour!"*

*"Sources have found footage showing the two infamous "dinner thieves", Josh and Chris Davies, entering the city at 10:34am today! Looks like someone is going to have a per-slice bill pay tonight!"]*

***Well, we're definitely not going Dutch for this one...***

⁕

## प्रभुतरुणाची डायरी

**नांदा सौख्यभरे**

| | |
|---|---|
| ०८-१२-२१ | श्री. गौरव प्रसन्न धैर्यवान कु. वैष्णवी निकीता कीर्तिकर |
| २४-१२-२१ | श्री. आकर्ष अद्वैत वैध कु. सिद्धी प्रमोद बेलोसे (आं.ज्ञा.) |
| २४-१२-२१ | कु. अनिशा भूषण तळपदे श्री. सौमित्र शाम पांचाळ (आं. ज्ञा.) |

**मरण**

| | | | |
|---|---|---|---|
| ०२-१२-२१ | श्री. गजानन सुंदरराव तळपदे, | वय ९६, | राणेवाडी, अंधेरी |
| २०-१२-२१ | श्री. प्रताप मोतीराम वेलकर, | वय ९९, | अंधेरी (पूर्व) |
| २०-१२-२१ | श्रीमती प्रेमा सुरेन्द्र विजयकर, | वय ८८, | पुणे |

## VELKAR 100 CELEBRATION



Trustees Of Vithoba Canoji Kothare Charity Ram wadi Ram Mandir Celebrated Happily Entering 100th Year of Honorable Chairman Mr. Pratap Motiram Balkrishna Velkar. Trustees From Left Mr. Ranjan K. Vijaykar, Mr. Parimal M. Talpade, Mr. Sudeep N. Kothare and Temple Manager Arvind P. Dhurandhar, Respectfully Felicitate and Gifted Shal, Shrifal & Shrikhand to Chairman. And Also Praying to Shri Swami Samarth Mauli Unlimited Blessings with Long Live Healthy & Wealthy To Mr. Pratap M.B. Velkar.

## महिला समाज

महिला समाजाची वार्षिक सभा संपन्न झाली. आधीच्या सभेची नोंद संमत करण्यात आली. काही बदल कार्यकारिणीत झाले. सौ. साया नवलकर या महिला समाजाच्या अध्यक्ष म्हणून सभेने एकमताने मान्यता दिली. सौ. नीता सेंजित यांची महिला समाजाच्या विश्वस्त म्हणून नियुक्त झाल्या. सायाताई आणि नीताताईंचे अभिनंदन आणि महिला समाजाच्या कार्यास शुभेच्छा.

⁕

## चुकीची दुरुस्ती

गीता आंबवणे यांनी सदराचा आढावा घेताना सौ. नंदिनी सुबोध देसाई यांचे वय ८०-८२ म्हटले आहे ते नव्वद असे वाचावे

⁕

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67